पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

वाशिम ■ वर्ष १ ■ अंक ११ ■ शुक्रवार, दि. ५ जून २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पुष्ठे ४

Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# महापालिका हद्दीत 'ओपन स्पेस' चा घोटाळा

## 50 ओपन स्पेस सापडेना, 130 ओपन स्पेसचे नकाशे गायब

प्रतिनिधी ५ जून




**अकोला:** शहरातील नागरिकांच्या हक्काच्या मोकळ्या जागांवर, म्हणजेच 'ओपन स्पेस' वर भूमाफिया आणि प्रशासकीय आशीर्वादाने दरोडा टाकल्याचा एक अत्यंत खळबळजनक प्रकार 'सिटी न्यूज सुपरफास्ट'च्या हाती आलेल्या विशेष कागदपत्रांवरून उघडकीस आला आहे.

अकोला महानगरपालिका क्षेत्रातील शेकडो लेआऊट मधील ५० पेक्षा जास्त मोकळ्या जागा अर्थात ओपन स्पेस प्रत्यक्ष जमिनीवरून गायब झाल्या आहेत, तर १३० पेक्षा जास्त जागांचे नकाशेच महापालिका आणि संबंधित प्रशासकीय यंत्रणेच्या दप्तरी उपलब्ध नाहीत. नागरिकांच्या ऑक्सिजन झोनवर, लहान मुलांच्या खेळण्याच्या मैदानांवर आणि ज्येष्ठ नागरिकांच्या विरंगुळ्याच्या जागांवर डल्ला मारणारा हा अकोल्याच्या इतिहासातील सर्वात मोठा जमीन घोटाळा मानला जात आहे.

### अकोल्याच्या हक्काच्या जागांवर डल्ला कोणी मारला ?

अकोला महानगरपालिका क्षेत्रातील ओपन स्पेस चा अधिकृत सरकारी माहितीचा कच्चा चिठ्ठा जेव्हा 'सिटी न्यूज सुपरफास्ट'ने उपसला, तेव्हा थक्क करणारी आणि संतापजनक आकडेवारी समोर आली आहे. सरकारी कागदपत्रांमध्ये अकृषक आदेश झालेले आहेत, पण प्रत्यक्षात ओपन स्पेस च्या जागा कुठे आहेत, याचे उत्तर ना महापालिकेकडे आहे ना भूमि अभिलेख विभागात. शासकीय कागदावर 'ओपन स्पेस' असे लिहिल असले तरी प्रत्यक्षात मात्र ओपन स्पेस घटनास्थळावर सापडल्या नाहीत. महापालिका प्रशासनाने अधिकृतपणे ४६८ लेआऊट पैकी पन्नास 'ओपन स्पेस सापडली नाही' अशी नोंद खुद्द एका पाहणीत समोर आली आहे. या ओपन स्पेस भुमाफियांनी कोणाला विकल्या असा प्रश्न आता विचारला जात आहे.

### १३० ओपन स्पेसचे नकाशा गायब

अकोला महापालिकेच्या हद्दीतील ४६८ लेआऊट पैकी ५० ओपन स्पेस सापडल्या नाहीत. आणि १३० ओपन स्पेस चे नकाशे गायब आहे. म्हणजे काय तर या पण, ओपन स्पेस विकल्या गेल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. महसुल यंत्रणा, महापालिका आणि भूमि अभिलेख या विभागाचे कोण या ओपन स्पेस घोटाळयात सहभागी आहे अशी विचारणा सुरु झाली आहे. नकाशाच सापडत नसल्यामुळे भूमाफियांना मोकळ्या जागांवर बेकायदेशीर बांधकामे करणे किंवा प्लॉट पाडून विकणे सोपे झाले आहे. शिलोडा, हिंगणा-म्हैसपूर, डाबकी, उमरी, कौलखेड आणि खडकी बु. सारख्या मुख्य भागांतील शेकडो सर्व्हे क्रमांकांचे नकाशे गायब आहेत.

### शेतजमीन ते लेआऊट चा प्रवास

शेतजमीनीचे लेआऊट टाकताना उपविभागीय अधिकारी, भूमि अभिलेख आणि महापालिका या तीन विभागाचा संबंध येतो. शेतजमीनीचे बिगर शेत जमीन करणे (एन.ए.) करणे हे करताना भूमि अभिलेख रस्ते,नाल्या, ओपन स्पेस आखून देते. २००२ पुर्वी उपविभागीय अधिकारी (एस.डी.ओ) आणि तदनंतर महापालिका आयुक्त हे ओपन स्पेस निश्चिती करत होते. असे असताना ५० ओपन स्पेस गायब होणे आणि १३० चे नकाशे महापालिकेला प्राप्त न होणे या मोठ्या घोटाळयात कोण सहभागी आहे. एखाद्या लेआऊटच्या दहा टक्के जागा ओपन स्पेससाठी राखीव असताना ती जागा कोणी कोणाला विकली हा शोधाचा विषय असून यात कोट्यावधीचे व्यवहार झाल्याची दाट शक्यता असून महापालिका नगर रचनाकार या सर्व प्रकरणात सर्व संबंधितांवर शासनाची फसवणूक व स्थानिक प्लॉटधारक नागरीकांच्या ओपन स्पेस चोरीचा गुन्हा दाखल करेल काय अशी विचारणा आता होत आहे.

### ते विकासक आणि खरेदीदार कोण

जेव्हा एखादा विकासक किंवा जमीन मालक शेतजमिनीचे प्लॉट पाडतो , तेव्हा तिथे सार्वजनिक वापरासाठी 'ओपन स्पेस' म्हणून सोडणे आणि ती महापालिकेकडे हस्तांतरित करणे बंधनकारक असते. परंतु, अकोल्यात एन.ए. आदेश झाले, प्लॉट विकून विकासक / बिल्डरांनी कोट्यवधी रुपये कमावले; पण जेव्हा महापालिकेने या जागांचा ताबा घेऊन तिथे विकास करणे गरजेचे होते, तेव्हा तिथे मोकळी जागाच शिल्लक राहिलेली नाही. काही ठिकाणी खुलेआम अतिक्रमण करून इमारती आणि पक्की बांधकामे उभारण्यात आली आहेत. महापालिका हद्दीतील १३० नकाशे गहाळ होण्यामागे महापालिकेतील कोणत्या बड्या अधिकाऱ्यांचा हात आहे ?. अशी विचारणा आता होत आहे. महसुल यंत्रणा, महापालिका आणि भूमि अभिलेख या विभागाचे कोण या ओपन स्पेस घोटाळयात सहभागी आहे अशी विचारणा सुरु झाली आहे. अकोलेकरांच्या हक्काच्या जमिनी गिळंकृत करणाऱ्या या भूमाफियांची आणि त्यांना पाठिशी घालणारे कोण, या महाघोटाळयाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# सलग तिसऱ्यांदा रेपो रेट जैसे थे !

## गव्हर्नर संजय मल्होत्रा यांची घोषणा, गृहकर्जदारांना दिलासा

प्रतिनिधी ५ जून



**मुंबई :** रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर संजय म्हलोत्रा यांनी पतधोरण विषयक समितीच्या बैठकीनंतर रेपो रेट जाहीर केला. यावेळी त्यांनी गेल्या काही महिन्यात युद्धांमुळे निर्माण झालेली अनिश्चितता यासंदर्भात भाष्य केलं. सध्या निर्माण झालेल्या आर्थिक स्थितीचे सखोल विश्लेषण केल्यानंतर रेपो रेट ५.२५ टक्के कायम ठेवत असल्याचे संजय मल्होत्रा यांनी जाहीर केले. आरबीआयने सलग तिसऱ्यांदा रेपो रेट कायम ठेवत गृहकर्जदारांना दिलासा दिला आहे.

आरबीआयनं पतधोरण विषयक समितीच्या बैठकीत रेपो रेट स्थिर ठेवला आहे. आरबीआयचे गव्हर्नर संजय म्हलोत्रा यांनी जागतिक पातळीवर भूराजनैतिक संघर्षामुळे निर्माण झालेली अस्थिरता, सप्लाय चेनमध्ये निर्माण झालेले अडथळे आणि दबाव याशिवाय ऊर्जा साधनांचे वाढलेले दर याचा परिणाम विकासाच्या वेगावर झाला असून महागाईच्या अंदाजात वाढ झाल्याचं पाहायला मिळत आहे. पुरवठा तुटवड्याचा परिणाम चौथ्या तिमाहीत आणि त्यानंतर देखील कायम राहील. जागतिक संकटानंतर देखील देशातील रिटेल महागाई दर निश्चित टार्गेटच्या खाली असल्याचं देखील सांगण्यात आलं आहे. संजय म्हलोत्रा यांनी म्हटलं की आर्थिक अनिश्चिततांच्या काळात आम्ही आव्हानं पार करुन पुढं जाऊ असा विश्वास आहे. पतधोरण विषयक समिती डेटावर लक्ष ठेवेल, आरबीआयचे गव्हर्नर संजय म्हलोत्रा म्हणाले की पुरवठ्यावरील दबाव आणि इतर घडामोडींवर आमचं लक्ष असेल. सलग तिसऱ्या तिमाहीत न्यूट्रल धोरण स्वीकारत रेपो रेट जैसे थे ठेवण्याचा निर्णय घेण्यात आल्याचं म्हलोत्रा यांच्याकडून सांगण्यात आलं.

# प्रादेशिक परिवहन कार्यालय, वाशिम येथे दुचाकी वाहनांसाठी MH 37 AN ही नवीन नोंदणी मालिका सुरू




**वाशिम :** आपल्या वाहनासाठी आकर्षक, लकी किंवा पसंतीचा क्रमांक मिळविण्याची ही सुवर्णसंधी आहे. इच्छुक वाहनधारकांनी विहित मुदतीत अर्ज सादर करून पसंतीचा क्रमांक आरक्षित करून घ्यावा, असे आवाहन सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी संग्रामकुमार जगताप यांनी केले आहे.

**विशेष व्यवस्था :** नवीन मालिका सुरू होताना नागरिकांची गर्दी व गैरसोय टाळण्यासाठी आकर्षक क्रमांकांच्या आरक्षणासाठी विशेष प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

**महत्त्वाच्या तारखा :** चारचाकी वाहनांसाठी आकर्षक क्रमांक आरक्षण अर्ज ८ जून २०२६ सकाळी ११.०० ते दुपारी २.३० दुचाकी वाहनांसाठी आकर्षक क्रमांक आरक्षण अर्ज ९ जून २०२६ सकाळी ११.०० ते दुपारी २.३० आवश्यक कागदपत्रे

**फोटो ओळखपत्र :** पत्त्याचा पुरावा (आधार कार्ड, दूरध्वनी बिल इ.) साक्षांकित कागदपत्रांच्या प्रती पसंतीच्या क्रमांकासाठी निर्धारित शुल्कासह अर्ज सादर करावा लागेल. एकाच क्रमांकासाठी एकापेक्षा अधिक अर्ज आल्यास सर्वाधिक रकमेचा डिमांड ड्राफ्ट (डी.डी.) सादर करणाऱ्या पात्र अर्जदारास तो क्रमांक देण्यात येईल.

**महत्त्वाचे :** क्रमांक आरक्षित झाल्यानंतर तो बदलून देता येणार नाही. आरक्षणानंतर ३० दिवसांच्या आत वाहन नोंदणी करणे आवश्यक आहे. भरलेली फी कोणत्याही परिस्थितीत परत मिळणार नाही. मुदतीत वाहन नोंदणी न झाल्यास आरक्षण आपोआप रद्द होईल.

# विदर्भात पावसाची प्रतीक्षा लांबली !

प्रतिनिधी ५ जून

**नागपूर :** प्रतीक्षा असलेल्या मान्सूनने गुरुवारी केरळात प्रवेश केला व दोन-तीन दिवसांत गोव्यापर्यंत पोहोचत १० जूनपर्यंत महाराष्ट्रात धडक देणार आहे. विदर्भात मात्र आनंदसरींसाठी आणखी काही काळ प्रतीक्षा करावी लागणार असून, तोपर्यंत उकाड्याचा त्रास सहन करावा लागणार आहे. गुरुवारी निरभ्र आकाशात उन्हाच्या चटक्यांनी नागपूरकरांना बेजार केले. यात रात्रीचा उकाडाही वाढला आहे.

हवामान विभागाने २४ तासांत म्हणजे ५ जून रोजी नागपूर जिल्ह्यात गडगडाटासह तुरळक पावसाचा अंदाज वर्तवला आहे. ६ जूनला ढगाळ वातावरण राहील, तर ७ व ८ जून रोजी पुन्हा पावसाची शक्यता वर्तवली आहे. मात्र, ढगाळ वातावरण व पावसाच्या शक्यतेतही तापमान उसळण्याचा व ४३ अंशांच्या जाण्याचा अंदाज आहे. त्यामुळे नागपूरकरांना सध्यातरी उकाड्यापासून दिलासा मिळण्याची शक्यता नाही. उलट, दरवर्षीप्रमाणे जूनच्या वातावरणातील आर्दतायुक्त दमटपणामुळे उकाडा आणखी त्रासदायक होण्याची शक्यता आहे. दरम्यान, गुरुवारी ब्रह्मपुरी येथे देशात सर्वाधिक ४४.२ अंश तापमानाची नोंद झाली.

# दर्जेदार दूरसंचार सेवा पोहोचविण्यासाठी सर्व विभागांनी सूचनांची अंमलबजावणी करावी : जिल्हाधिकारी



प्रतिनिधी ५ जून

**वाशिम :** जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हास्तरीय दूरसंचार समिती (DLTC) बैठकीत जिल्ह्यातील मोबाईल नेटवर्क, भारतनेट, बीएसएनएल ४जी सॅच्युरेशन, ५जी सेवा, राईट ऑफ वे (दें), ॲॅल्ड-प्रणाली आणि संचार साथी उपक्रमाचा आढावा घेण्यात आला.

जिल्ह्यातील ७८० गावे मोबाईल नेटवर्कद्वारे कव्हर २,१३४ बिटीएस व ५८० मोबाईल टॉवर्स कार्यरत बीएसएनएल ४जी सॅच्युरेशन प्रकल्प पूर्ण प्रणालीच्या प्रभावी वापरासाठी विशेष प्रशिक्षण आयोजित करण्याचे निर्देश नागरिकांनी 'संचार साथी' ॲप व संकेतस्थळाचा वापर करून दूरसंचार सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# मुठा तलाव मासेमारी ठेक्यासाठी ई-निविदा आमंत्रित




**वाशिम :** मुठा तलाव मासेमारी ठेक्यासाठी ई-निविदा आमंत्रित वाशिम जिल्ह्यातील मुठा (२३ हेक्टर) तलावाचा मासेमारी ठेका सन २०२६-२७ ते २०३०-३१ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी ई-निविदा प्रक्रियेद्वारे देण्यात येत आहे. मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था, मत्स्यव्यवसाय सहकारी संघ, मच्छीमार, मत्स्यसंवर्धक, खाजगी उद्योजक तसेच इच्छुक व्यक्तींनी या संधीचा लाभ घ्यावा.

# जीसीसी-टीबीसी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी महत्वाचे

**वाशिम :** महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुणे यांच्या वतीने एप्रिल २०२६ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या जीसीसी-टीबीसी व ऑनलाइन लघुलेखन परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क परतावा देण्यात येणार आहे.

पात्र विद्यार्थ्यांनी ८ जून २०२६ पर्यंत ऑनलाइन अर्ज करावा. सन २०२५-२६ चे उत्पन्न प्रमाणपत्र अथवा ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र अधिवास प्रमाणपत्र जातीचा शासकीय पुरावा जीसीसी-टीबीसी उत्तीर्ण प्रमाणपत्र (एप्रिल २०२६).

# खुल्या प्रवर्गातील युवक-युवतींसाठी करिअर घडविण्याची सुवर्णसंधी!

**वाशिम :** महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुणे आणि इंडो जर्मन टूल रूम (आयजीटीआर), औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने आर्थिकदृष्ट्या दुर्बल खुल्या प्रवर्गातील युवक-युवतींसाठी रोजगाराभिमुख कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

**या प्रशिक्षणाची विशेष वैशिष्ट्ये :** प्रशिक्षण पूर्णपणे मोफत निवास व भोजनाची मोफत सुविधा उद्योगांच्या गरजेनुसार अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण अनुभवी तज्ज्ञांकडून प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन प्रशिक्षणानंतर रोजगार व स्वयंरोजगारासाठी सहकार्य प्रशिक्षणामध्ये समाविष्ट अभ्यासक्रम : सीएनसी (Computer Numerical Control) तंत्रज्ञान सीएडी/सीएएम (CAD/CAM) डिझाइन तांत्रिक आराखडा निर्मिती उत्पादन रचना औद्योगिक यंत्रसामग्री डिझाइन पीएलसी प्रणाली रोबोटिक्स व ऑटोमेशन मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल व इलेक्ट्रॉनिक्स तंत्रज्ञान

पात्रता : दहावी उत्तीर्ण आयटीआय धारक डिप्लोमा धारक पदवीधर युवक-युवती.

# केंद्र शासनाच्या अमृत योजनेच्या निधीचा चुराडा

## मजिप्रा, महापालिकेचे दूर्लक्ष

प्रतिनिधी ५ जून




**अकोला:** केंद्र शासनच्या अमृत २.० मध्ये शहरात सुरु असलेली भूमिगत गटार योजना ही भविष्यात अकोल्यासाठी अडचणीची ठरणार आहे. यातून ना पाणी जाईल ना मलबा त्याच बरोबर या योजनेत वस्ती नसलेल्या ठिकाणी सुरु असलेले गटार योजनेच्या कामांची चौकशी केल्यास केंद्र सरकारच्या योजनेच्या निधीचा झालेला गैरवापर अधोरेखित होत असून पुण्यातील कंपनीच्या मनमानी कारभार आणि मजिप्रा, महापालिका यांचे दूर्लक्ष यामुळे कोट्यावधीची भूमिगत गटार योजना अकोल्यात फसण्याची भिती व्यक्त केली जात आहे.

ज्या भागात लोकवस्ती नाही अशा राजेश्वर कॉलनी, साई कॉलनी, गोकर्णा कॉलनी जाजू नगर अन्नपुर्णा माता मंदिरामागे थेट गटर योजना राबविण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. ज्या भागात लोकवस्ती नाही, नागरिक राहत नाही, मलजल निर्माण होत नाही अशा ठिकाणी कुठल्या आधारावर ही सरकारी योजना राबविली गेली याचा खुलासा पुणे स्थित कंपनी, मजिप्रा, महापालिका का करत नसल्याची ओरड आता होत आहे.

### इलेक्ट्रिकल इंजिनिअरकडे भूमिगत चे काम कसे

या योजनेत भविष्यात लोकवस्ती असलेल्या भागात देखील भुमिगत गटार योजनेचे काम सुरु असल्याचा दावा महापालिका अभियंता अमोल डोईफोडे यांनी केला आहे. इलेक्ट्रिकल इंजिनिअर असलेल्या अमोल डोईफोडे यांच्याकडे या योजनेचा चार्ज कसा काय असा प्रश्न विचारला जात आहे. महापालिकेत कार्यकारी अभियंता हे पद किती वर्षांपासून रिकामे आहे. प्रतिनियुक्तीवर महापालिकेत कार्यकारी अभियंता का येत नाही याची ही विचारणा आता सुरु झाली आहे.

# गोल्डन अवरमध्ये मोफत उपचारासाठी केंद्र सरकारची महत्त्वाकांक्षी योजना

**वाशिम :** वाढत्या रस्ते अपघातांच्या पार्श्वभूमीवर अपघातग्रस्तांचे प्राण वाचविण्यासाठी केंद्र शासनाने 'पीएम राहत योजना' सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत रस्ते अपघातात जखमी झालेल्या व्यक्तींना अपघातानंतरच्या 'गोल्डन अवर'मध्ये तातडीचे व रोखरहित उपचार उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यामुळे अपघातामुळे होणाऱ्या मृत्यूंचे प्रमाण कमी करण्यास मोठी मदत होणार आहे.

अपघातानंतरच्या पहिल्या एका तासात योग्य वैद्यकीय उपचार मिळाल्यास सुमारे ५० टक्के मृत्यू टाळता येऊ शकतात. याच उद्देशाने मोटार वाहन (दुरुस्ती) अधिनियम, २०१९ च्या कलम १६२ नुसार ही योजना राबविण्यात येत आहे. योजनेअंतर्गत अपघातग्रस्तांना कमाल १.५ लाख रुपयांपर्यंतच्या उपचारांचा लाभ मिळणार असून अपघाताच्या तारखेपासून सात दिवसांपर्यंत उपचार खर्चाचा समावेश करण्यात आला आहे.




रुग्णाला अपघातानंतर २४ तासांच्या आत रुग्णालयात दाखल करणे आवश्यक असून पोलीस यंत्रणेकडून अपघाताची पुष्टी निश्चित कालावधीत केली जाणार आहे.

योजनेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला असून ई-डिटेल्ड ॲक्सिडेंट रिपोर्ट आणि ट्रान्झॅक्शन मॅनेजमेंट सिस्टम २.० यांच्या माध्यमातून अपघात नोंदणी, उपचार व दावा निकाली काढण्याची प्रक्रिया सुलभ करण्यात आली आहे. तसेच ११२ आपत्कालीन सेवा, सीसीटीएनएस प्रणाली आणि एसएमएस सूचनांची जोड देण्यात आली आहे.

योजनेच्या अंमलबजावणीत अपघातग्रस्त, त्यांचे कुटुंबीय, गुड समॅरिटन, पोलीस, रुग्णालये, जनरल इन्शुरन्स कौन्सिल तसेच जिल्हाधिकारी यांची महत्त्वपूर्ण भूमिका राहणार आहे. विमाधारक वाहनांच्या प्रकरणांमध्ये जनरल इन्शुरन्स कौन्सिलमार्फत तर अविमाधारक प्रकरणांमध्ये जिल्हाधिकाऱ्यांमार्फत दावे निकाली काढले जाणार आहेत.

मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम १६२ नुसार केंद्र सरकारने गोल्डन अवरमध्ये अपघातग्रस्तांना रोखरहित उपचार उपलब्ध करून देण्यासाठी ही योजना तयार केली असून त्यासाठी 'मोटार वाहन अपघात निधी'ची तरतूद करण्यात आली आहे. या निधीतून अपघातग्रस्तांच्या उपचारांचा खर्च भागविण्यात येणार आहे. ष

रस्ते अपघातानंतर वेळेवर उपचार मिळाल्यास अनेकांचे प्राण वाचू शकतात. त्यामुळे नागरिकांनी अपघातग्रस्तांना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यासाठी पुढाकार घ्यावा व या योजनेचा लाभ मिळवून द्यावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा

शुक्रवार, दि. ५ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

पर्यावरण संरक्षण आजच्या काळात का आवश्यक आहे? हा प्रश्न आता केवळ शैक्षणिक चर्चेचा विषय राहिलेला नाही, तर मानवी अस्तित्वाशी निगडित वास्तव बनला आहे. वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण, नैसर्गिक साधनसंपत्तीवरील वाढता ताण, हवामानातील बदल, पाण्याची टंचाई आणि जैवविविधतेसमोरील आव्हाने यामुळे पर्यावरण संरक्षणाची गरज पूर्वीपेक्षा अधिक तीव्रतेने जाणवत आहे. मानव आणि निसर्ग यांचे नाते परस्परावलंबी आहे. निसर्गाचे संतुलन अबाधित राहिले तरच विकासाची वाटचाल शाश्वत होऊ शकते. म्हणूनच दरवर्षी ५ जून रोजी साजरा होणारा जागतिक पर्यावरण दिन हा केवळ एक दिवस नसून पर्यावरण संरक्षणाच्या सामूहिक संकल्पनेचा जागतिक उत्सव आहे. जागतिक पर्यावरण दिनाची संकल्पना १९७२ मध्ये स्वीडनमधील स्टॉकहोम येथे भरलेल्या संयुक्त राष्ट्रांच्या 'मानवी पर्यावरण परिषदेत' मांडण्यात आली. त्यानंतर संयुक्त राष्ट्र महासभेने ५ जून हा दिवस 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून घोषित केला आणि १९७३ पासून त्याचे औपचारिक आयोजन सुरू झाले.

# पर्यावरणाचा जागर घराघरातून वाढवू या !

या उपक्रमामागील उद्देश जगभरातील नागरिक, संस्था आणि शासन व्यवस्थांना पर्यावरणाबाबत जागरूक करणे हा होता. आज हा दिवस १५० हून अधिक देशांमध्ये विविध उपक्रमांद्वारे साजरा केला जातो. पर्यावरणाच्या महत्त्वाबाबत जगातील अनेक तज्ज्ञांनी वेळोवेळी महत्त्वपूर्ण विचार मांडले आहेत. पर्यावरणवादी आणि संयुक्त राष्ट्रांच्या माजी अहवालांमध्ये 'पृथ्वी ही आपल्याला पूर्वजांकडून मिळालेली संपत्ती नसून पुढील पिढीकडून घेतलेले कर्ज आहे' हा विचार वारंवार अधोरेखित करण्यात आला आहे. सुप्रसिद्ध पर्यावरण अभ्यासक 'लेस्टर ब्राऊन' यांनी म्हटले आहे की, 'पर्यावरण आणि अर्थव्यवस्था यांना वेगळे करता येत नाही; पर्यावरण कोलमडले तर अर्थव्यवस्थाही टिकणार नाही. तर ज्येष्ठ पर्यावरणवादी 'वंगारी मथाई' यांनी वृक्षलागवडीला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले. या विचारांतून पर्यावरण संवर्धन ही केवळ सरकारी जबाबदारी नसून लोकसहभागाची चळवळ असल्याचे स्पष्ट होते.

भारतासमोर पर्यावरणासंदर्भात अनेक संधी आणि आव्हाने आहेत. लोकसंख्या वाढ, शहरी विस्तार, पाण्याचे व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन आणि हवामान बदलाच्या परिणामांशी जुळवून घेणे ही महत्त्वाची क्षेत्रे आहेत. महाराष्ट्राच्या संदर्भात पाहिले तर जलस्त्रोतांचे संवर्धन, जंगलांचे संरक्षण, शहरी भागातील हरित क्षेत्र वाढविणे, नदी संवर्धन, मृदा धूप रोखणे, सौर ऊर्जा, पवन ऊर्जा या माध्यमातून अक्षय वीज निर्मितीचे लक्ष्य पूर्ण करणे आणि जैवविविधतेचे जतन करणे यांसारख्या बाबींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था आणि नागरिक यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे या क्षेत्रात अनेक सकारात्मक उपक्रम राबविले जात आहेत. त्यामुळे पर्यावरण संरक्षणाकडे केवळ समस्यांच्या दृष्टीने न पाहता, शाश्वत विकासाच्या संधी म्हणून पाहण्याची आवश्यकता आहे. विकासकामे आणि पर्यावरण यांचा समतोल राखणे हे आधुनिक प्रशासनासमोरील मोठे आव्हान आहे. त्यामुळे कोणत्याही मोठ्या प्रकल्पासाठी पर्यावरणीय परवानगी आवश्यक मानली जाते. यामागील उद्देश विकासाला अडथळा निर्माण करणे नसून, त्या प्रकल्पाचा हवा, पाणी, जमीन, वनसंपदा, वन्यजीव आणि स्थानिक समुदायांवर होणारा परिणाम अभ्यासणे हा आहे. पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन (एन्व्हायरमेंट इम्पॅक्ट असेसमेंट ) प्रक्रियेमुळे विकासकामे अधिक जबाबदारीने आणि शाश्वत पद्धतीने राबविणे शक्य




**जागतिक पर्यावरण दिन**

होते. परिणामी विकास आणि पर्यावरण संरक्षण यांच्यात संतुलन राखले जाते.त्यामुळे मोठमोठ्या वसाहती निर्माण करताना पाणवठे निर्माण करणे,त्या बाजूला जैवविविधता निर्माण होईल यासाठी जागरूक असणे आवश्यक आहे,असे छोटे प्रयोग प्रामाणिकपणे निर्माण केल्यास विकास आणि पर्यावरण दोन्ही उद्दिष्टे साध्य करता येतात.

महाराष्ट्र शासनाने पर्यावरण संवर्धनासाठी अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतले आहेत.पर्यावरण व हवामान बदल विभाग यासाठी विशेष प्रयत्न करत आहे.लोकसहभागातील पर्यावरण कृती कार्यक्रम, जनतेच्या सहभागासह पर्यावरण प्रकल्प राबविण्यात येत आहे. यापूर्वीचे राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी एकाच वर्षी महत्त्वाकांक्षी '५० कोटी वृक्ष लागवड अभियान' राबविले होते.दरवर्षी राज्य शासन जून - जुलै महिन्यात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड मोहीम राबविते. सध्या बांधावर बांबू लागवडीची एक मोहीम महाराष्ट्रात यशस्वीपणे राबविली जात आहे.राष्ट्रीय बांबू मिशन अंतर्गत शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, पर्यावरण संवर्धन करणे,उपजीविका विकासाची संधी देणे आणि बांबू-आधारित उद्योगांना चालना देणे हा बांधावरील बांबू लागवड योजनेचा मुख्य उद्देश आहे. याशिवाय माझी वसुंधरा अभियान, जलयुक्त शिवार अभियान,राज्य तलाव संवर्धन योजना,शेततळे अभियान,गाळमुक्त धरण गाळयुक्त शेती, नाला रुंदीकरण व खोलीकरण योजना,नदी संवर्धन उपक्रम, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे कार्यक्रम, मॅंग्रोव्ह संवर्धन प्रकल्प, तसेच ग्रामीण व शहरी भागांमधील विविध हरित उपक्रमांमुळे पर्यावरण संरक्षणाला चालना मिळत आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख योजनांपैकी एक असणाऱ्या जलयुक्त शिवार योजनेतून जलस्त्रोतांमध्ये वृद्धी झाल्याचे सिद्ध झाले आहे.या महत्वाकांक्षी योजनेला देशातील अनेक राज्यांनी लागू केले आहे. यातून प्रोत्साहन घेऊन अलीकडेच राज्यात हरित क्षेत्र वाढविण्यासाठी व्यापक वृक्षलागवड आणि वनसंवर्धनाच्या नव्या संकल्पनांनाही प्रोत्साहन दिले जात आहे.राज्याच्या हरित आच्छादनात वाढ करण्यासाठी दीर्घकालीन उद्दिष्टांसह विविध उपक्रम राबविले जात आहेत.

हरित पट्टा वाढविण्यासाठी शासनाबरोबरच विविध सामाजिक संस्था,शैक्षणिक संस्था आणि नागरिकही पुढे येत आहेत. शहरी भागांमध्ये उद्याने, जैवविविधता उद्याने, रस्त्यालगत वृक्षलागवड, नदीकाठ संवर्धन आणि स्थानिक वृक्ष प्रजातींचे संरक्षण यावर भर दिला जात आहे. ग्रामीण भागात सामाजिक वनीकरण, गाव तळी,तलाव खोलीकरण, नाला रुंदीकरण, परिसरातील हरितीकरण आणि सामुदायिक वृक्षलागवड कार्यक्रम प्रभावीपणे राबविले जात आहेत. या उपक्रमांमुळे पर्यावरणीय समतोल राखण्यास मदत होत आहे.

पर्यावरण संरक्षणाची खरी ताकद मात्र सामान्य नागरिकांमध्ये आहे. प्रत्येकाने आपल्या परिसरात लहान-लहान पर्यावरणीय व्यवस्था (इकोसिस्टम) विकसित करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. घराच्या अंगणात, गच्चीवर, शाळा-महाविद्यालय परिसरात किंवा सार्वजनिक जागांमध्ये स्थानिक वृक्ष, फुलझाडे, औषधी वनस्पती लावून जैवविविधतेला प्रोत्साहन देता येते. पावसाचे पाणी साठविणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे, कचऱ्याचे वर्गीकरण करणे, पाण्याची बचत करणे आणि स्थानिक जलस्त्रोतांचे संरक्षण करणे ही देखील पर्यावरण संवर्धनाची प्रभावी साधने आहेत. 'जल, जमीन आणि जंगल' ही आपल्या जीवनव्यवस्थेची तीन मूलभूत आधारस्तंभ आहेत. त्यांचे संरक्षण करणे ही आजच्या पिढीची नैतिक जबाबदारी आहे. आपण ज्या नैसर्गिक संपत्तीचा लाभ घेत आहोत, ती पुढील पिढीपर्यंत सुरक्षितपणे पोहोचविणे हेच खरे शाश्वत विकासाचे तत्त्व आहे.मान्सूनच्या आगमनानंतर राज्यभर पेरणीच्या कामांना वेग येतो.

**प्रवीण टाके**
उपसंचालक
विभागीय कार्यालय,
कोल्हापूर मो. ९७०२८५८७७७

**भारत का राजपत्र**
**The Gazette of India**

सी.जी. डी.एस.-अ.-21042026-271939
CG-DL-E-21042026-271939
ससाधारण EXTRAORDINARY
भाम ११ अण्ड उप-खण्ड (११)
PART 11 Section 3-Sub-section (ii)
प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY

सं 1890) नई दिल्ली, सोमवार, अप्रैल २०, २०२६/चैत्र ३०, १९४८
No. 1890) NEW DELHI, MONDAY, APRIL 20, 2026/CHAITRA 30, 1948

## सड़क परिवहन और राजमार्ग मंत्रालय
## अधिसूचना
## नई दिल्ली, २० अप्रैल, २०२६

का.बा. १९६१ (अ).- केन्द्रीय नरकार, राष्ट्रीय राजमार्ग अधिनिगम १९५६ (१९५६ का ४८) (जिसे इसमें इसके पश्चात् उक्त अधिनियम कहा गया है) की धारा ३क की उप-धारा (१) द्वारा प्रदत्त शक्तियों का प्रयोग करते हुए, यह समाधान हो जाने के पच्चात् कि महाराष्ट्र राज्य के अकोला जिले में राष्ट्रीय राजमार्ग संख्या १६१ए के कि.मी. ०/०० से कि.मी. ३/१०० (महान-अकोला भाग) तक के भूखंड का निर्माण (बार्शीटाकळी वायपास दो / चार लेन पेव्ड शोल्डर सहित का बताने, नादि), अनुरक्षण, प्रबन्धन और प्रचालन के लोक प्रयोजन के लिए यह भूमि अपेक्षित है जिसका संक्षिप्त वर्णन नीचे अनुसूची में दिया गया है, ऐसी भूमि का अर्जन करने के अपने आशय की घोषणा करती है।

कोई भी व्यक्ति, जो भूमि में हितबद्ध है, उक्त अधिनियम की धारा ३ग की उपधारा (१) के अधीन पूर्वीस प्रयोजन के लिए ऐसी भूमि के उपयोग पर राजपत्र में इस अधिसूचना के प्रकाशन की तारीख से इक्कीस दिन के भीतर अपनी आपत्ति प्रकट कर सकेगा।

ऐसी प्रत्येक आक्षेप सक्षम प्राधिकारी, तया उपविभागीय अधिकारी मुर्तीजापुर, को लिखित रूप ने किया जागसा और उसमें उसके आधार अधिकथित किए जाएंगे और सक्षम प्राधिकारी, आपत्तिकर्ता को व्यक्तिगत रूप में या किसी विधि व्यवसायी द्वारा सुने जाने का अवत्तर देगा और ऐसी आजेगो की सुनवाई के पचात् तथा ऐसी और जांच करने के पश्ज्ञान, पदि कोई हो, जिसे सक्षम प्राधिकारी आवश्यक समझे आदेश द्वारा या तो को अनुज्ञात कर सकेगा या अनुज्ञात कर सकेगा।

उक्त अधिनियम की धारा ३ग की उपधारा (२) के अधीन सजम प्राधिकारी द्वारा किया गया कोई भी आदेत अंतिम होगा।

इस अधिसूचना के अंतर्गत आने बाली भूमि के रेखांक और अन्य स्थर मम प्राधिकारी के उक्त कार्यालय में उपलब्ख हैं और उनका तिच्य पतियों द्वारा निरीक्षण किया जा सकता है।

**अनुसूची**

महाराष्ट्र राज्य के अकोला जिले में राष्ट्रीय राजमार्ग संख्या १६१ए. के. कि.मी. ०/००से कि.मी. ३/१०० (महान-अकोला भाग) लिए बर्जन की जाने वाली संरचना रहित अथवा संरचना महित भूमि का संक्षिप्त विवरण.

| राज्य का नाम : महाराष्ट्र | | | जिले का नाम : अकोला | | |
|---|---|---|---|---|---|
| क्रमिक संख्या | सर्वेक्षण संख्या | भूमि का प्रकार | भूमि की प्रकृति | भूमि का क्षेत्रफल (स्थानीय इकाई) | भूमि का क्षेत्रपाल (हेक्टेयर) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| **तालुक का नाम : बार्शीटाकळी** | | | | | |
| **गांव का नाम : अश्कारीपूर** | | | | | |
| १ | ३७ Paiki | सरकारी | अकृषक | ०.०११५ (हेक्टेयर) | ०.०११५ |
| **गांव का नाम : बार्शीटाकळी** | | | | | |
| २ | 45/1/E | निजी | अकृषक | ०.०४ (हेक्टेयर) | ०.०४ |
| | | | | **Total** | **0.0515** |

[F. No. RO/MUM/NH(O)/2023-24/72/3A)

**रोख अमीनखान, निदेशक**

**MINISTRY OF ROAD TRANSPORT AND HIGHWAYS**
**NOTIFICATION**
**New Delhi, the 20th April, 2026**

S.O. 1961/E)- in exercise of powers confirmed by sub-section (1) of section 3A of the National Highways Act, 1956 (48 of 1956) (hereinafter referred to as the said Act), the Central Government, after being satisfied that for the public purpose, the land, the brief description of whith is given in the Schedule below is required for Building (Barshitaki Bypass Twu/ Four Lane with paved shoulder) maintenance, managemom and operation of National Highway No. 1614 in the stretch of land from Km 0/00 tu Km 3100 (Mahan-Akola Section) in the District of Akola in the State of Maharashtra, hereby declares itt intention to acquire such land Any person interested in the said land may, within twenty-one days from the date of publication of this notification in the Official Gazette, raise objections to the use of such land for the aforesaid purpose under sub-section(1) of section 3C of the said Act.

Every such objection shall be made to the Competent Authority, namely, Sub Divisional Officer Murtizapur, in writing and shall set out the grounds thereof and the Competent Authority shall give the objector an opportunity of being heard, either in person or by a legal practitioner, and may, after hearing all such objections and after making such further enquiry, if any, as the Competent Authority thinks necessary, by order, either Allow or disallow the objections.

Any order made by the Competent Authority under sub-section (2) of section 3C of the said Act shall be final.

The land plans and other details of the land to be covered under their notification are available and can be inspected by the interested person at the aforesaid office of the Competent Authority.

**SCHEDULE**

Brief description of the land to be acquired, with or without structure falling National Highway No. 161A within the stretch of the land from Km 0/00 to Km 3/100 (Mahan-Akola Section) in the District of Akola in the State of Maharashtra.

| State: MAHARASHTRA | | | District: AKOLA | | |
|---|---|---|---|---|---|
| SL No. | Survey/Plot Number | Type of Land | Nature of Land | Area (in Local Unit) | Area (in Hectares) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| **Taluk: Barshitildi** | | | | | |
| **Village: Ashkaripur** | | | | | |
| 1 | 37 Paili | Government | Non Agriculture | 0.0115 (Hectare | 0.0115 |
| **Village : Barshitildi** | | | | | |
| 2 | 45/1/E | Private | Non Agriculture | 0.04 (Hecture) | 0.04 |
| | | | | **Total** | **0.0515** |

[F. No. RO/MUM/NH(O)/2023-24/72/3A)

**SHAIKH AMINKHAN,**
Directos

जा.क्र./जिमाका/अकोला/जाहिरात/३०/२०२६

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
शुक्रवार, दि. ५ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# भूमी अभिलेख कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी सुरू

प्रतिनिधी ५ जून

## ■ जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख भारती खंडेलवाल यांची माहिती

**अकोला :** भूमी अभिलेख उपसंचालक किंवा जमाबंदी आयुक्त कार्यालय, पुणे यांच्याकडून प्राप्त झालेल्या अधिकृत आदेशानंतर अकोला भूमी अभिलेख कार्यालयाचे तत्कालीन उप अधीक्षक भूमि अभिलेख पंकज पवार यांच्या विरोधात पोलिसांत एफआयआर (गुन्हा) दाखल करण्यात आला आहे. पुणे कार्यालयामार्फत करण्यात आलेल्या विशेष तपासणीनंतर हे आदेश देण्यात आले होते, अशी माहिती भूमि अभिलेख विभागाच्या जिल्हा अधीक्षक भारती खंडेलवाल यांनी दिली. या प्रकरणात इतर काही कर्मचाऱ्यांचा सहभाग आहे का, याची पडताळणी करण्यासाठी त्यांची विभागीय चौकशी देखील सुरू करण्यात आली आहे. असे ही त्यांनी सिटी न्यूज सुपरफास्ट सोबत बोलताना सांगितले.

उप अधीक्षक पंकज पवार याने केलेला गैरप्रकार वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संमतीशिवाय किंवा पाठिंब्याशिवाय शक्य आहे का?' असा प्रश्न




विचारला असता, जिल्हा अधीक्षक खंडेलवाल यांनी स्पष्ट केले की, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम १४९ आणि १५० अन्वये फेरफार प्रमाणित करण्याचे सर्व अधिकार पूर्णतः संबंधित कायद्यानुसार त्या अधिकाऱ्याच्या अखत्यारीत असतात. या प्रक्रियेसाठी त्यांना कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्याच्या पूर्वसंमतीची किंवा स्वाक्षरीची कायदेशीर आवश्यकता नसते. त्यामुळे पवार यांनी घेतलेले निर्णय आणि त्यांच्या स्वाक्षरीने झालेले फेरफार हे त्यांच्याच कार्यकक्षेत झाले आहेत. त्यामुळे फेरफार प्रकरणात सर्वस्वी पंकज पवार हे सर्वस्वी जबाबदार असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

मूळ लेआऊटचे नकाशे भूमी अभिलेख विभागाकडे नसतात, तर विभागाकडे केवळ 'मोजणीच्या शिटा' असतात. कार्यालयातील सर्व मोजणी शिटा पूर्णपणे सुरक्षित असून, विभागाकडील संपूर्ण अभिलेख स्कॅन आणि डिजिटाईज करण्यात आला आहे. त्यामुळे कोणतेही दस्तऐवज गायब झालेले नाहीत.'शासकीय लोकसेवकाचे मुख्य कर्तव्य हे शासकीय नियमांचे काटेकोर पालन करणे हेच असते,' असे सांगत खंडेलवाल यांनी स्पष्ट केले की, सध्या पुणे कार्यालयाच्या आदेशानुसार मुख्य संशयितावर गुन्हा नोंदवण्यात आला आहे.या प्रकरणात इतर कोणी सहभागी आहे काय हा पोलिस तपासाचा भाग आहे. असे ही जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख भारती खंडेलवाल म्हणाल्या.

# जुना कापड बाजारातील खड्डा अजूनही तसाच

## ♦ मागील वर्षी एक व्यक्ती वाहूनही प्रशासन ढिम्म



प्रतिनिधी ५ जून

**अकोला :** महापालिका प्रशासनाचा अक्षम्य निष्काळजीपणा आणि दुर्लक्षामुळेच गेल्या पावसाळ्यात शहरातील सर्वात गजबजलेला टिळक रोड, विदर्भ केसरी ब्रिजलाल बियाणी चौक, जुना कापड बाजारातील नाल्याचा खड्डा उघडा राहिल्याने ओसंडून वाहत होता. ज्यामध्ये एक व्यक्ती पडून दूरपर्यंत वाहून गेला आणि दुसऱ्या दिवशी त्याचा मृतदेह सापडला होता. गेल्या वर्षीच्या घटनेतून प्रशासनाने धडा घेतलेला नाही. या बाबतीत आश्चर्य वाटत आहे.

त्या अपघातानंतर प्रशासन आणि नेतेमंडळी खडबडून जागे झाले. त्यांनी दुःखही व्यक्त केले. पण खेदाची गोष्ट म्हणजे हा जीवघेणा नाला आणि खड्डा आजही भयानक रूप धारण करून तशाच स्थितीत आहे. संबंधित अधिकारी आणि प्रशासन प्रमुखांचे दुर्लक्ष अजूनही कायम आहे आणि आता पुन्हा पावसाळा जवळ आला आहे. अपेक्षा एवढीच आहे की, पावसाळ्यापूर्वी केल्या जाणाऱ्या नालेसफाईच्या कामांसोबतच या जीवघेण्या खड्ड्याचा तात्काळ बंदोबस्त केला जावा; अन्यथा, पुन्हा एखादी गंभीर दुर्घटना घडण्याची दाट शक्यता आहे.

# खामगावात तरुणावर चाकूहल्ला ; चौघांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी ५ जून


**खामगाव :** तालुक्यातील सारोळा येथील एका तरुणावर चाकूने हल्ला करून मारहाण केल्याची घटना ३ जून रोजी सायंकाळी घडली. या प्रकरणी खामगाव ग्रामीण पोलिसांनी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सारोळा येथील रहिवासी विकास हरिचंद्र जाधव हे ३ जून रोजी सायंकाळी सुमारे ७:३० वाजता दुचाकीने घरी जात होते. चिखली रोडवरील एका पेट्रोल पंपाजवळ असलेल्या विजय पान पॅलेससमोर त्यांना पांडुरंग निंबाजी चव्हाण, प्रकाश निंबाजी चव्हाण, किशोर रोहिदास चव्हाण व विठ्ठल निंबाजी चव्हाण (सर्व रा. सारोळा) यांनी अडविले. यावेळी चौघांनी विकास जाधव यांना चापटाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच किशोर रोहिदास चव्हाण याने चाकूने हल्ला करून त्यांच्या खांद्यावर व तळहातावर वार केल्याने ते जखमी झाले. या घटनेप्रकरणी विलास हरिचंद्र जाधव यांनी खामगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली.फिर्यादीच्या तक्रारीवरून पांडुरंग निंबाजी चव्हाण, प्रकाश निंबाजी चव्हाण, किशोर रोहिदास चव्हाण व विठ्ठल निंबाजी चव्हाण यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ११८ (१), ३५२ व १३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास एएसआय भगवान काळबागे करीत आहेत.

# भीमनगर होजियरी मिल भागात रहिवाशांच्या आरोग्याशी खेळ

पाणी वाहून जाण्यासाठी जागाच नाही मनपा प्रशासन लक्ष देईल का

प्रतिनिधी ५ जून

**अकोला :** भीमनगर होजियरी मिल भागातील रहिवासी प्रचंड यातना सहन करीत आहेत. या भागात सांडपाणी वाहून नेण्यासाठी नाली नाही. त्यामुळे रस्त्याच्या बाजूला डबके साचले आहे. विचित्र स्थिती या ठिकाणी पाहायला मिळते. नगर सेवकही लक्ष देत नाहीत. त्यामुळे निदान महापालिका प्रशासनाने तरी ही समस्या सोडवावी अशी मागणी आहे. कारण पावसाळ्यात तर नागरिकांना खूप त्रास सहन करावा लागतो. साचलेले पाणी रस्त्यावर वाहते. ही समस्या सुटणे आवश्यक आहे सांडपाणी व्यवस्थापन नाही ही समस्या केवळ या भागात नाही तर विविध भागात हा प्रश्न आहे. भीमनगर होजियरी मिल भागात ही समस्या उग्र बनली आहे. अजय रामटेके नगर सेवक असताना साचलेले पाणी उपसण्यासाठी पुढाकार घेत होते. परंतु आता हा भाग दुर्लक्षित असल्याचा आरोप या परिसरातील नागरिक करीत आहेत. महापालिका आरोग्य विभागाने या भागाची पाहणी करून तातडीने प्रश्न सोडवावा अशी मागणी केली जात आहे.



# निवडणुकीत नियमांचे काटेकोर पालन व्हावे

प्रतिनिधी ५ जून

## राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे पातूर येथे मतदान केंद्रे व स्ट्रॉंगरूमची पाहणी

**अकोला :** पातूर नगरपरिषद तसेच आगामी काळातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण निवडणूक यंत्रणा सक्षम, सज्ज आणि सतर्क ठेवावी. प्रत्येक नियमाचे काटेकोर पालन होणे अत्यावश्यक आहे, असे स्पष्ट निर्देश राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिले. जिल्ह्यातील नगरपरिषद निवडणूक तयारी व आगामी काळातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने आढावा त्यांनी घेतला. यावेळी आयोगाचे सचिव सुरेश काकाणी, जिल्हाधिकारी वर्षा मीना, पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे, न.




प. प्रशासन सहआयुक्त विश्वनाथ वडजे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पातूर व अकोट नगरपरिषद निवडणुकांच्या अनुषंगाने मतदान केंद्रांची तयारी, मनुष्यबळाचे नियोजन, तसेच आवश्यक साधनसामग्री यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. आगामी ग्रामपंचायत व इतर निवडणुकांसाठी आरक्षण सोडत, प्रशिक्षण प्रक्रिया आणि यंत्रणा अधिक सक्षम करण्यावरही विशेष भर देण्याचे निर्देश देण्यात आले. दरम्यान, आयुक्तांनी पातूर येथे प्रत्यक्ष भेट देऊन मतदान केंद्रे व स्ट्रॉंगरूमची पाहणी केली. न. प. मराठी शाळा क्र. १ येथील मतदान केंद्राला त्यांनी दिली. पातूर येथे त्यांनी मतदान कर्मचाऱ्यांशी संवाद साधला व निवडणूक प्रक्रियेतील बारकावे समजावून सांगितले. निवडणुकीदरम्यान कोणत्याही प्रकारचे गैरप्रकार घडता कामा नये. आचारसंहितेचे काटेकोर पालन करून निवडणुका शांततापूर्ण, पारदर्शक आणि निष्पक्ष वातावरणात पार पाडाव्यात, असे निर्देश राज्य निवडणूक आयुक्तांनी दिले.

# कांबळे यांच्या माघारीने खळबळ ; महाविकास आघाडीचे आंदोलन

प्रतिनिधी ५ जून

**यवतमाळ :** स्थानिक प्राधिकरण मतदारसंघाच्या निवडणुकीत महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार साहेबराव कांबळे यांनी ऐनवेळी उमेदवारी मागे घेतल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. या निर्णयाविरोधात महाविकास आघाडीने गुरुवारी शहरातील दत्त चौकात निदर्शने करत तीव्र निषेध व्यक्त केला. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आरोप केला की, उमेदवारी मागे घेण्याचा निर्णय घेताना कांबळे यांनी आघाडीतील कोणत्याही घटक पक्षाला विश्वासात घेतले नाही. उलट विरोधी पक्षातील काही नेत्यांच्या उपस्थितीत त्यांनी माघार जाहीर केल्याने या निर्णयामागे राजकीय दबाव किंवा इतर कारणे असावीत, अशी शंका व्यक्त करण्यात आली. आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी महायुती सरकारवर निशाणा साधत लोकशाही प्रक्रियेला बाधा पोहोचविण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप केला. आर्थिक प्रलोभने आणि दडपशाहीच्या माध्यमातून निवडणुकीवर प्रभाव टाकण्यात




आल्याचा दावा करत कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी केली. दत्त चौकात झालेल्या आंदोलनात काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड. सचिन नाईक, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राजेंद्र गायकवाड, संपर्कप्रमुख किशोर इंगळे, संजय ठाकरे, जितेंद्र मोघे, राहुल ठाकरे, आरिज बेग, संजय वानखेडे, बबलू देशमुख, वैशाली सवई, कुणाल जानकर, शशांक केंढे, सय्यद रियाझ, कुशाल ठाकरे, रहमान शाह, जयराम मुनेश्वर, संजय महल्ले यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी, नगरसेवक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या आंदोलनाची माहिती काँग्रेस सोशल मीडिया समितीचे जिल्हाध्यक्ष कृष्णा पुसनाके यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनातून दिली.

# लोकेश चंद्र यांना महा आयकॉन पुरस्कार

## ♦ केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रदान



प्रतिनिधी ५ जून

**अमरावती :** मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तसेच महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांचा विजेच्या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल 'महा आयकॉन २०२६' हा जीवनगौरव पुरस्कार देऊन पुढारी' माध्यम समूहातर्फे गौरव करण्यात आला. केंद्रीय भूपृष्ठ परिवहन आणि महामार्गमंत्री. नितीन गडकरी यांच्या हस्ते मुंबईत गुरुवारी हा पुरस्कार देण्यात आला.

राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत, प्रसिद्ध शास्त्रज्ञ अनिल काकोडकर, पुढारी समुहाचे मुख्य संपादक . प्रतापसिंह जाधव आणि संपादक . योगेश जाधव मंचावर उपस्थित होते. महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीत आणि राष्ट्राच्या उभारणीत मोलाचे योगदान देणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान करण्यासाठी 'पुढारी' माध्यम समूहाने 'महा आयकॉन २०२६' या नव्या उपक्रमाचे आयोजन केले होते.

# म्हैसांग परिसरातील वीज पुरवठा वारंवार खंडित

प्रतिनिधी ५ जून

**अकोला :** आधीच उकाड्याने हैराण झालेल्या म्हैसांग व परिसरातील नागरिकांना वारंवार होणाऱ्या खंडित वीज पुरवठ्याचाही त्रास सहन करावा लागत आहे. त्यातच आता पावसाळ्याचे दिवस समोर असल्याने निदान पावसाळ्यापूर्वी तरी ही समस्या कायमस्वरूपी मार्गी लावावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे. रात्री बेरात्री केव्हाही अचानक वीज पुरवठा जात असल्याने नागरिकांना संपूर्ण रात्रच अंधारात काढावी लागत आहे. संबंधितांना फोनवरून माहिती देण्याचा प्रयत्न केला असता कोणीच प्रतिसाद देत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. ही समस्या न सोडविल्यास आम्हाला रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागेल, असा








# बुलडाणा, अमरावतीसह पाच आधुनिक संत्रा प्रक्रिया प्रकल्पांना मान्यता

प्रतिनिधी ५ जून

## ♦ चार कोटींच्या प्रकल्पांसाठी ५० टक्के शासकीय अनुदान

**अकोला :** आधुनिक संत्री प्रक्रिया केंद्र उभारणे, या महत्त्वाकांक्षी योजनेंतर्गत बुलडाणा, अमरावती आणि नागपूर जिल्ह्यांतील पाच विविध ठिकाणच्या प्राथमिक प्रक्रिया प्रकल्पांच्या प्रस्तावांना सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने अखेर राज्य शासनाने प्रशासकीय मान्यता प्रदान केली. यामुळे विदर्भातील संत्री उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, या मंजुरीमुळे विदर्भातील संत्री उत्पादक पट्ट्यात अत्याधुनिक प्रक्रिया केंद्रांचे जाळे निर्माण होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. शासनाने जारी केलेल्या निर्णयानुसार, प्रत्येकी ४ कोटी रुपये खर्चाच्या खालील पाच संस्थांच्या प्राथमिक प्रक्रिया प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये कृष्णार्पण फार्मर प्रोड्युसर



कंपनी लिमिटेड, मोर्शी (जि. अमरावती), कृषी उत्पन्न बाजार समिती, नागपूर, बुलढाणा अर्बन फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेड, संग्रामपूर (जि. बुलढाणा), कृषी उत्पन्न बाजार समिती, काटोल (जि. नागपूर) आणि कृषी उत्पन्न बाजार समिती, कळमेश्वर (जि. नागपूर) यांचा समावेश आहे. मंजूर झालेल्या सर्व प्रकल्पांची किंमत प्रत्येकी ४ कोटी रुपये आहे. लाभार्थी संस्थेला पहिल्यांदा स्वतःचा किमान १५ टक्के स्वनिधी खर्च करावा लागेल. उर्वरित ८५ टक्के रक्कम बँकेकडून कर्ज स्वरूपात उभारणे आवश्यक राहील. प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ प्रत्यक्ष पाहणी करून बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र देईल. हा दाखला सादर केल्यानंतर शासनाकडून प्रकल्प किमतीच्या कमाल ५० टक्के मर्यादित (जास्तीत जास्त २ कोटी रुपये) अनुदान पणन मंडळामार्फत थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केले जाईल. निविदा प्रक्रियेत जर शासनाने निश्चित केलेल्या किमतीपेक्षा कमी किमतीची निविदा मंजूर झाली, तर त्या मंजूर निविदा रकमेच्या ५० टक्केच अनुदान अनुज्ञेय राहील. प्रक्रिया केंद्रासाठी लाभार्थ्याकडे स्वतःची किंवा किमान ३० वर्षांच्या दीर्घ मुदतीची भाडेतत्त्वावरील जागा असणे बंधनकारक आहे, जी शासनाकडे गहाण राहील.

### पुणे कृषी पणन मंडळ नोडल एजन्सी

◆ या संपूर्ण योजनेसाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे हे नोडल एजन्सी म्हणून काम पाहत आहे. प्रशासकीय मंजुरी मिळाल्यामुळे आता लाभार्थी संस्थांना त्वरित निविदा प्रक्रिया राबवून कंत्राटदाराची नियुक्ती करावी लागणार आहे. चालू आर्थिक वर्ष म्हणजेच सन २०२६-२०२७मध्येच या प्राथमिक प्रक्रिया प्रकल्पांचे काम पूर्ण करण्याचे कडक आदेश शासनाने दिले आहेत. तसेच, प्रकल्पाचा दैनंदिन खर्च, वीज-पाणी देयके, देखभाल व मनुष्यबळाचा खर्च संबंधित संस्थांनाच करावा लागणार असून, त्यासाठी शासनाकडून कोणताही अतिरिक्त निधी मिळणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
शुक्रवार दि ५ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

राजकीय ॲक्टर,
स्त्रीभ्रूणहत्येचा फॅक्टर,
अविवेकी डॉक्टर ,
बोगस कॅरेक्टर...


सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
शुक्रवार दि २९ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
जन्मापुर्वीच घात, करतात गर्भपात...
उमलण्यापूर्वीच कुस्करतात कळी, डॉक्टर घेतात अनेक बळी !
*स्त्रिभ्रुण हत्येचा गोरख धंदा * रिसोड, कारंजा नंतर मालेगावात पकडला बंदा

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
शनिवार दि ३० मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
जन्मापुर्वीच घात, करतात गर्भपात...
राजकीय ॲक्टर, स्त्रीभ्रूणहत्येचा फॅक्टर, अविवेकी डॉक्टर !
* आमदारकीचे स्वप्न पाहणाऱ्या अविवेकी डॉक्टरला गर्भपातातून कोट्यवधीची लॉटरी
* राजाश्रय लाभलेल्या अविवेकी डॉक्टरचा महापराक्रम
* आरोग्य व पोलीस विभागाच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
रविवार दि ३१ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
राजकीय ॲक्टर, स्त्रीभ्रूणहत्येचा फॅक्टर, अविवेकी डॉक्टर , बोगस कॅरेक्टर...
जन्मापुर्वीच घात, करतात गर्भपात...
आरोपी ज्ञात , दाखविला अज्ञात !
कारवाई न करण्याचा करार , आरोपी फरार
*राजाश्रयाच्या भरवशावर अनेक वर्षापासून मालेगावात गैरप्रकार
* अविवेकी डॉक्टरच्या गर्भपाताचा गोरखधंदा आरोग्यविभागाने कायमस्वरूपी बंद करावा
* जनतेची मागणी

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
मंगळवार दि २ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
राजकीय ॲक्टर, स्त्रीभ्रूणहत्येचा फॅक्टर, अविवेकी डॉक्टर , बोगस कॅरेक्टर...
डॉ. माने यांचे राजकारण, पैशाचे धोरण, जन्मापूर्वीच चिमुकल्याचे मरण...
जन्मापुर्वीच घात, करतात गर्भपात...
स्त्रीभृणहत्या पुन्हा पुन्हा दाखल करा खुनाचा गुन्हा !
* रिसोड, कारंजा व मालेगावातील कारवाईमुळे खळबळ *जिल्ह्यात अनेक ठिकाणी असे गैरप्रकार सुरू
डॉक्टरांचे चॅलेंज, म्हणे प्रकरण करतो मॅनेज

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
बुधवार दि ३ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
राजकीय ॲक्टर, स्त्रीभ्रूणहत्येचा फॅक्टर, अविवेकी डॉक्टर , बोगस कॅरेक्टर...
डॉ. मानेची खोटी शान, जन्मापुर्वीच काटतो चिमुकल्याची मान !
* कर्तव्याची नाही जान, सामाजिकतेची नाही भान, पैशालाच मान, मानवतेची घान...
*मालेगाव येथील अविवेकी डॉक्टरच्या दवाखान्यातील स्त्रीभ्रूण हत्या प्रकरण...

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
गुरूवार दि ४ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
राजकीय ॲक्टर, स्त्रीभ्रूणहत्येचा फॅक्टर, अविवेकी डॉक्टर , बोगस कॅरेक्टर...
आरोपी ज्ञात, दाखविला अज्ञात... कारवाई न करण्याचा करार, अज्ञाताविरूध्द तक्रार, आरोपी फरार !
* अविवेकी डॉक्टरच्या डॉक्टर पत्नीच्या नावाची परिसरात चर्चा
* मालेगाव येथील बेकायदेशिर स्त्रीभृण हत्या प्रकरण
* पोलिस व आरोग्य विभागाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह
जिल्ह्यातील विविध महिला संघटनांचे मौनव्रत

आरोपी ज्ञात, दाखविला अज्ञात...

# स्त्रीभृण हत्येचे महापाप, आरोपींना करू नका माप !




•सिटी न्युज ब्युरो @वाशीम•

* तपास यंत्रणा बदला, कठोर कारवाई करा- जनतेची मागणी
* मालेगाव येथील बेकायदेशिर स्त्रीभृण हत्या प्रकरण
* पोलिस व आरोग्य विभागाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह




वाशीम जिल्ह्यातील मालेगाव नगरीत राजाश्रयाच्या भरवशावर सुरू असलेल्या गर्भपाताच्या आणि बेकायदेशीररित्या गर्भ लिंग निदान चाचण्या करून कोट्यवधीची कमाई करणाऱ्या अविवेकी डॉक्टरसह त्याच्या महापापात सहभागी असलेल्या अज्ञात महिला डॉक्टरला पोलिसांनी 'ज्ञात' करून गजाआड करावे. तसेच आरोग्य विभागाने अविवेकी डॉक्टरच्या सोनोग्राफीच्या गोरखधंद्याला कायमस्वरूपी बंद करण्याची मागणी जागरूक जनतेकडून केल्या जात आहे. स्त्री भृण हत्येच्या महापापत सहभागी असलेल्यांना माप करू नये त्यांच्यावर कठोर कारवाई करावी तपास यंत्रणा बदलून स्थानिक गुन्हे शाखा किंवा एसआयटीकडे द्यावी अशी मागणी होत आहे.

गेल्या अनेक वर्षापासून राजाश्रयाच्या आड अविवेकी डॉक्टरचा सोनोग्राफीचा व्यवसाय गर्भ लिंग निदान चाचणी करून स्त्री भृण हत्या करण्यासाठी नावारूपास आला आहे. अविवेकी डॉक्टरचे लागेबांधे वाशीम जिल्ह्यातील डॉक्टरांसह अनेक डॉक्टरच्या हाताखाली कंपाऊंडरचे काम करणाऱ्या आणि सद्या अविवेकी डॉक्टरच्या महापापात सहभागी होवून दलाली खाणाऱ्या बोगस डॉक्टरांसोबत असल्याची चर्चा आहे. मालेगाव नगरीच्या गजबजलेल्या बाजारपेठेच्या मध्यभागी अविवेकी डॉक्टरचा दवाखाना आहे. या दवाखान्याची ख्याती 'गुड न्यूज' आणि 'बॅड न्यूज' च्या अफलातून बेकायदेशीर व्यवसायामुळे वाशीम जिल्ह्यातच नव्हेतर परिसरातील विदर्भ, मराठवाड्यातील जिल्ह्यासह महाराष्ट्राच्या शेजारी असलेल्या काही राज्यापर्यंत अविवेकी डॉक्टरच्या लाभार्थींची व्याप्ती असल्याची मालेगाव परिसरात चर्चा आहे. शासनाची गर्भ लिंग निदान चाचणी करण्यासाठी 'बंदी' आहे. अशा चाचण्या करणाऱ्या सोनोग्राफी सेंटर वर कारवाई करण्याचे आरोग्य यंत्रणेला अधिकारही आहेत. परंतु मालेगावात खुलेआम गर्भ लिंग निदान चाचण्या करून स्त्री भृण हत्या करणार्या या अविवेकी डॉक्टरच्या विरोधात कारवाई केल्या जात नव्हती. एखाद्या अधिकाऱ्याने कारवाईचा प्रयत्न केला तर त्या अधिकाऱ्यावर दबाबतंत्राचा, पैशाच्या आमिषाचा वापर करून या महापापाची शृंखला अविरत सुरू ठेवण्यासाठी अविवेकी डॉक्टरसह त्याला साथ देणारी सर्वांना माहिती असलेली महिला डॉक्टर, दलाल यांनी साथ देवून या महापापाच्या कमाईतून आर्थिक सुबत्ता प्राप्त केल्याची माहिती प्राप्त झाली आहे. गेल्या अनेक वर्षापासून राजाश्रयाच्या आड सुरू असलेल्या या गोरखधंद्यावर मालेगाव येथील आरोग्य विभागाच्या धाडसी वैद्यकीय अधीक्षकांनी अविवेकी डॉक्टरच्या सौनोग्राफी सेंटरवर बनावट महिला पेशंट पाठवून अविवेकी डॉक्टरच्या पापाचा भांडाफोड केला आहे.

या प्रकरणी आरोग्य विभागाच्या वतीने मालेगाव पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. परंतु या तक्रारीत पापात सक्रीय सहभागी असलेल्या महिला डॉक्टरला अज्ञात महिला डॉक्टर दाखवून हे प्रकरण रफादफा करण्यासाठी अविवेकी डॉक्टरची 'टीम' युद्धस्तरावर प्रयत्न करत असल्याची सत्ताधारी पक्षातील कार्यकर्त्यांमध्ये चर्चा आहे. त्यामुळे तपास यंत्रणा बदलावी अशी मागणी जनतेतून होत आहे.

## थोडक्यात

### कागदपत्रांच्या जुळवाजुळवीत पालक हैराण !

•सिटी न्युज ब्युरो @ रिसोड•

दहावी आणि बारावी परीक्षेचे निकाल लागून काही दिवस झाले असून, शाळा व महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रियेला खऱ्या अर्थाने मोठा वेग आला आहे. अकरावी, आयटीआय, पॉलिटेक्निक तसेच पहिल्या प्रवेशासाठी विद्यार्थी व पालकांची आवश्यक कागदपत्रे गोळा करण्यासाठी एकच धावपळ उडाली आहे. त्यामुळे परिसरातील सेतू सुविधा केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र, तहसील कार्यालय आणि झेरॉक्स सेंटरवर सकाळपासूनच नागरिकांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळत असून, पालकांची चांगलीच तारांबळ उडत आहे.

दहावी-बारावीचा निकाल लागल्यानंतर आता विद्यार्थ्यांना पुढील उच्च शिक्षणाचे वेध लागले आहेत. मात्र, ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने फॉर्म भरताना विविध प्रकारच्या शासकीय दाखल्यांची अट घालण्यात आल्यामुळे पालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. प्रवेशासाठी शाळा सोडल्याचा दाखला (टीसी), जन्मदाखला, जातीचा दाखला, नॉन-क्रिमीलेअर, उत्पन्न प्रमाणपत्र, आधार कार्ड, बँक पासबुक, रेशन कार्ड आणि रहिवासी दाखला अशा अनेक कागदपत्रांची पूर्तता करावी लागत आहे. यातील एकही कागद कमी पडला तर संपूर्ण प्रवेश प्रक्रिया खोळंबण्याची भीती असल्याने, पालक आपली सर्व कामे बाजूला ठेवून आधी कागदपत्रे गोळा करण्याला प्राधान्य देत आहेत.

### दर्जेदार दूरसंचार सेवा पोहोचविण्याच्या सुचना -जिल्हाधिकारी

**वाशीम :** दूरसंचार सुविधा ही काळाची गरज असून ग्रामीण व शहरी भागातील प्रत्येक नागरिकाला अखंडित मोबाईल नेटवर्क आणि इंटरनेट सेवा उपलब्ध होणे अत्यावश्यक आहे. यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वय साधून दिलेल्या सूचनांची तातडीने अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले. जिल्ह्यातील दूरसंचार सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी जिल्हास्तरीय दूरसंचार समितीची (डिएलटीसी) बैठक ४ जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते. जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी जयेश खंडारे, राहुल काकड यांच्यासह भारत संचार निगम लिमिटेडचे अकोला व वाशिम येथील अधिकारी, विविध दूरसंचार कंपन्यांचे संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

आरोग्य यंत्रणा 'कागदी घोडे' हे मोडीत काढले वाक्य...

# वाशीम जिल्हा रुग्णालयात 'अशक्य ते शक्य' !

*गरिबांच्या आशेचा किरण बनली स्वरयंत्राची यशस्वी शस्त्रक्रिया

•सिटी न्युज ब्युरो @वाशीम•

'सरकारी दवाखान्यात जाऊन काय होणार?' हा प्रश्न सामान्य माणसाच्या मनात नेहमीच घर करून असतो. मात्र, वाशीम जिल्हा सामान्य रुग्णालयातील डॉक्टरांच्या टीमने या प्रश्नाला आपल्या कर्तृत्वाने एक सकारात्मक उत्तर दिले आहे. केवळ उपचारच नव्हे, तर गरिबांच्या चेहऱ्यावर हसू फुलवणारे 'देवदूत' म्हणून या रुग्णालयातील वैद्यकीय पथक समोर आले आहे.

नुकत्याच घडलेल्या एका घटनेत, ६० वर्षांच्या एका ज्येष्ठ रुग्णाच्या स्वरयंत्रावर (वोकॅल कॉर्ड) दुर्मिळ आणि अत्यंत गुंतागुंतीची गाठ काढण्याची शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. वृद्धत्वामुळे आणि आजाराच्या गांभीर्यामुळे रुग्णाचे कुटुंब पूर्णपणे खचले होते. खाजगी रुग्णालयांचा महागडा खर्च त्यांच्या आवाक्याबाहेरचा होता. अशा निराशेच्या छायेखाली असताना, जिल्हा रुग्णालयाचे दार त्यांच्यासाठी 'आशेचा किरण' ठरले. ही शस्त्रक्रिया केवळ तंत्रज्ञानाची कसोटी नव्हती, तर ती डॉक्टरांच्या संयमाची आणि माणुसकीची परीक्षा होती. कान-



नाक-घसा तज्ज्ञ डॉ. संतोष बेदरकर, डॉ. योगेश जाजू आणि डॉ. सोनाली टिकाईत यांनी अत्यंत नाजूकपणे, नसा-नसांची काळजी घेत शस्त्रक्रिया पूर्ण केली. त्यांना





बधिरीकरण तज्ज्ञ डॉ. राम हजारे, डॉ. भाग्यश्री भालेराव आणि डॉ. गौरव महाजन यांनी तितक्याच ताकदीने साथ दिली. शस्त्रक्रिया यशस्वी होताच, रुग्णाच्या कुटुंबियांच्या डोळ्यांत आलेले आनंदाश्रू हेच या कामगिरीचे खरे फलित होते. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे आणि डॉ. अविनाश पुरी यांच्या मार्गदर्शनाखाली आज जिल्हा रुग्णालय केवळ इमारत राहिली नसून, ते सामान्य माणसाचा 'आधारस्तंभ' बनले आहे. पूर्वी ज्या शस्त्रक्रियांसाठी लोकांना खासगी दवाखान्यात धाव घ्यावी लागत असे, त्या आज मोफत आणि दर्जेदार पद्धतीने आपल्याच वाशीममध्ये होत आहेत. अपेंडिक्स, गर्भाशयाचे विकार किंवा पित्ताशयाचे खडे यांसारख्या आजारांवर आता लॅप्रोस्कोपीद्वारे विनासायास उपचार मिळणे, ही गोरगरिबांसाठी मोठी सुखद बाब आहे.

वाशीम जिल्हा रुग्णालयाने आज केवळ वैद्यकीय सेवेचा दर्जा उंचावला नाही, तर 'सरकारी रुग्णालय म्हणजे केवळ कागदी घोडे नाचवणारी यंत्रणा' हा समज मोडीत काढला आहे. डॉक्टरांनी केवळ रुग्ण बरा केला नाही, तर एका कुटुंबाला पुन्हा नव्याने जगण्याचे बळ दिले आहे. या यशस्वी कामगिरीबद्दल संपूर्ण आरोग्य विभागासह सामान्य नागरिकांमधूनही डॉक्टरांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## २५ हजाराची लाच आली गळ्यात आदर्श सरपंच एसीबीच्या जाळ्यात !

•सिटी न्युज ब्युरो @वाशीम•



मालेगाव तालुक्यातील आदर्श ग्रामपंचायत म्हणून ओळख असलेल्या ढोरखेडा येथील महिला सरपंचाला २५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ अटक करण्यात आली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (ACB) ४ जून रोजी ही धडक कारवाई केली.

आरोपी महिला सरपंच, ग्रामपंचायत ढोरखेडा, ता. मालेगाव लाचेची रक्कम: २५,००० रुपये. सापळा कधी रचला ३ जूनपासून या कारवाईसाठी एसीबीने नियोजन केले होते. ३ जून रोजी दुपारीच लाचेच्या मागणीची पडताळणी करण्यात आली होती. कारवाई कधी झाली ४ जून रोजी सापळा यशस्वी करून महिला सरपंचाला रंगेहाथ पकडण्यात आले. सध्या याप्रकरणी पोलीस स्टेशन शिरपूर येथे गुन्हा दाखल करण्याची आणि पुढील कायदेशीर कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू आहे. विशेष बाब एकीकडे तपासणी, दुसरीकडे लाचखोरी या कारवाईदरम्यान एक धक्कादायक आणि नाट्यमय प्रसंग पाहायला मिळाला. ज्यावेळी एसीबीने हा सापळा रचून सरपंचाला पकडले, नेमक्या त्याच वेळी 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' अंतर्गत गोंदिया जिल्ह्यातील एक उच्चस्तरीय चमु या आदर्श ग्रामपंचायतच्या कामकाजाची तपासणी करत होती. एकीकडे आदर्श कारभाराचे मूल्यमापन सुरू असतानाच, दुसरीकडे सरपंच लाच घेताना पकडल्या गेल्याने परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे.

घर पाडलं, कर्ज काढलं, काय करावे कळेना...

## पण घरकुलाचा दुसरा हप्ता मिळेना!



•दिपक मापारी @रिसोड•

गरिबांना हक्काचे घर देण्याचा गाजावाजा करणाऱ्या पंतप्रधान मंत्री आवास योजनेचा रिसोड तालुक्यातील अनेक लाभार्थ्यांसाठी सध्या मनस्तापाचा विषय बनला आहे. पहिला हप्ता म्हणून अवघे १५ हजार रुपये खात्यात जमा झाल्यानंतर दुसरा हप्ता मिळेल, या आशेवर लाभार्थ्यांनी जुनी घरे पाडली, कर्ज काढले, मुला-मुलींची लग्ने पुढे ढकलली आणि नव्या घराचे बांधकाम स्लॅबपर्यंत नेले. मात्र मागील सहा महिन्यांपासून दुसरा हप्ता न मिळाल्याने शेकडो कुटुंबे आर्थिक संकटात सापडली आहेत. शासनाकडून मिळणाऱ्या दीड लाख रुपयांच्या अनुदानाच्या भरोशावर अनेकांनी बांधकामात आणि अनिश्चिततेच्या छायेत दिवस काढत आहेत. पावसाळा काही दिवसांवर येऊन ठेपला असताना छप्पराविना राहण्याची वेळ लाभार्थ्यांवर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



विशेष म्हणजे बांधकामाची अट पूर्ण करूनही निधी का मिळत नाही, याचे स्पष्ट उत्तर प्रशासनाकडून दिले जात नसल्याची तक्रार लाभार्थी करीत आहेत. शासनाच्या विलंबामुळे अनेकांचे लाखो रुपये अडकले असून कर्जाचे हप्ते आणि व्याजाचा बोजा दिवसेंदिवस वाढत आहे. 'घरकुल मिळेल म्हणून जुनं घर पाडलं; आता ना जुनं घर राहिलं, ना नवीन घर पूर्ण होत आहे,' अशी आयुष्यभराचा निवारा असलेली जुनी पत्र्याची व खापराची घरे जमीनदोस्त केली. आज तीच कुटुंबे अर्धवट लोकसभा निवडणुकीपूर्वी रिसोड तालुक्यातील अनेक गावांमध्ये २० ते १२५ पर्यंत लाभार्थ्यांना घरकुल मंजूर झाले. पहिला हप्ता म्हणून १५ हजार रुपये खात्यात जमा झाल्यानंतर लाभार्थ्यांनी स्वतःचे पैसे खर्च करून तसेच कर्ज काढून घरबांधणीची कामे सुरू केली. अनेकांनी बांधकाम स्लॅब स्तरापर्यंत पूर्ण केले आहे. मात्र, मध्यंतरीच्या काळात निधीअभावी कामे रखडली. त्यातच वारंवार हंगामी अभियंते बदलल्याने लाभार्थ्यांना अधिक त्रास सहन करावा लागत आहे. सध्या निधी उपलब्ध असूनही तांत्रिक मंजुरी आणि बिल प्रक्रियेत टाळाटाळ होत असल्याची तक्रार लाभार्थ्यांकडून केली जात आहे. दरम्यान गटविकास अधिकारी आणि संबंधित प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी लाभार्थ्यांकडून केली जात आहे..

# साहेब, कामे न करता वित्त आयोगाचा निधी गायब !

* भ्रष्टाचाराची चौकशी करा, अन्यथा आंदोलन * युवा सेनेचे जिल्हाप्रमुख प्रदिप मोरे यांचा इशारा

•प्रभाकर नाईकवाडे @रिसोड•

अंचळ ग्रामपंचायतीतील विविध विकासकामे, ई-ग्रामस्वराज पोर्टलवरील व्हाउचर आणि खर्चाच्या नोंदींमुळे निर्माण झालेल्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर अंचळसह केनवड व परिसरातील संबंधित ग्रामपंचायतींमधील विकासकामांची निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, अशी मागणी युवासेना जिल्हाप्रमुख प्रदीप पाटील मोरे यांनी केली आहे.

चौकशीत अनियमितता किंवा दोष आढळल्यास संबंधितांवर तात्काळ कारवाई करावी, अन्यथा युवासेना तीव्र आंदोलन छेडेल, असा इशाराही त्यांनी प्रशासनाला दिला आहे. १४ वा वित्त आयोग, १५ वा वित्त आयोग तसेच विविध विकास योजनांअंतर्गत करण्यात आलेल्या कामांचा निधी, व्हाउचर, मोजमाप पुस्तिका (एमबी), अंदाजपत्रके आणि प्रत्यक्ष कामांची सखोल पडताळणी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. ई-ग्रामस्वराज पोर्टलवरील विविध खर्चाच्या नोंदी आणि नागरिकांकडून पुढे येत असलेल्या तक्रारींमुळे परिसरात संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून, दोषी आढळणाऱ्या संबंधितांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी, अशी भूमिका युवासेनेने घेतली आहे. याबाबत बोलताना युवासेना जिल्हाप्रमुख प्रदीप पाटील मोरे म्हणाले, 'जनतेच्या पैशातून होणाऱ्या प्रत्येक विकासकामाचा हिशोब जनतेला मिळालाच पाहिजे. चौकशीत अनियमितता आढळल्यास कोणालाही पाठीशी न घालता कठोर कारवाई करण्यात यावी.

अन्यथा युवासेना लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडेल.' दरम्यान, अंचळ प्रकरणानंतर केनवड परिसरातील विविध गावांमधूनही नागरिक स्वतःहून माहिती, कागदपत्रे आणि व्हाउचर सिटी न्यूज सुपरफास्टकडे देत असल्याचे समोर येत आहे. या सर्व कागदपत्रांची पडताळणी करून वस्तुस्थिती जनतेसमोर मांडण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत असून, यासंदर्भातील वृत्तमालिका पुढील भागांत प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती मिळत आहे.

### केनवड परिसरातील गावागावात रस्त्यावर रस्ता, कामांवर काम; भ्रष्टाचारात करून गिळला दाम..?

केनवड परिसरातील विविध गावांमध्ये रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता तसेच इतर विकासकामांवर थातूरमातूर कामे पुन्हा दाखवून लाखो रुपयांचा निधी हडपल्याची चर्चा परिसरात रंगू लागली आहे. या कामांवर मोठ्या प्रमाणात निधी खर्च झाल्याच्या नोंदी ई-ग्रामस्वराज पोर्टलवर दिसून येत आहेत. मात्र प्रत्यक्षात ही कामे दर्जेदार झाली आहेत का आणि मंजूर अंदाजपत्रकानुसार पूर्ण झाली आहेत का, याबाबत नागरिकांमध्ये संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. गावागावांतून विविध व्हाउचर, मोजमाप पुस्तिका (एमबी) आणि खर्चाच्या नोंदींबाबत माहिती पुढे येत असून, या सर्व कामांची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी होत आहे. केनवड परिसरातील गावागावांत अशाच प्रकारचा कारभार घडला आहे का, याबाबतही नागरिकांमध्ये चर्चा सुरू झाली आहे. अनेक विकासकामांवर खर्च दाखवून प्रत्यक्षात कामांची गुणवत्ता आणि अंमलबजावणी याबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. त्यामुळे परिसरातील सर्व ग्रामपंचायतींच्या विकासकामांची, व्हाउचर, एमबी, अंदाजपत्रके आणि निधी खर्चाची निष्पक्ष चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.


मंगळवार दि २ जून २०२६ सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम वाशीम Express
अंचळ येथील कामाची देयके आधी, भ्रष्टाचाराचा विधी, गायब निधी...
भ्रष्टाचाराची चतृःसुत्री, कामे कागदोपत्री !
म्हणे सिईओच भ्रष्टाचारात साथी, चौकशी समिती आमच्या हाती
हा घ्या व्हाउचरचा पुरावा; असे कितीतरी व्हाउचर, सिटी न्यूज सुपरफास्टच्या हाती

बुधवार दि ३ जून २०२६ सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम वाशीम Express
अंचळ येथील कामाची देयके आधी, भ्रष्टाचाराचा विधी, गायब निधी...
ग्रामसेवकांचा प्रताप भारी, एमबी नुसार व्हाचर दाखवा एकतरी !
* व्हाउचरमध्ये विकास दिसतो, पण गावात शोधावा लागतो *म्हणे सीईओ हाताशी; मग भीती कशाचा
अंचळ केवळ सुरुवात... आता केनवड परिसरातील गावागावांचा सिटी न्यूज सुपरफास्ट हिशोब बाहेर आणणार

गुरूवार दि ४ जून २०२६ सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम वाशीम Express
ग्रामसेवक पैशासाठी लाचार, कामे न करता भ्रष्टाचार !
*या, ग्रामसेवकांचा प्रताप अंचळसह केनवडात तर नाही ना
* म्हणे सीईओ हाताशी; मग भीती आम्हाला कशाची..?

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय नविन नगर परिषद कॉम्प्लेक्स, रविवार बाजार, वाशिम जि. वाशिम येथे प्रकाशित केले. ■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/26/A3072, RRC Helpline No. 8484842135